महाराष्ट शासन

क्र.आय.टी.२०१६/प्र.क्र. ६३/मा.तं.क.
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
२५, मर्झबान पथ, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई -४०० ००१
दिनांक : २३/०९/२०१६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय : जिल्हा परिषद स्तरावरील ई-गव्हर्नन्स विषयक प्रकल्पांच्या आढाव्याबाबत...

महोदय,

शासनाच्या विविध सेवा नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने प्रत्यक्ष कार्यालयात न जाता माफक दरात पुरविणे तसेच, शासनाचे कामकाज जलदगतीने , अधिक कार्यक्षम पणे व कागदरहित करणे यासाठी सन २०११ ला ई-गव्हर्नन्स धोरण आखण्यात आले आहे. यास अनुसरून जिल्हास्तरावर राबविलेल्या सर्व ई-गव्हर्नन्स विषयक प्रकल्पांचा आढावा मा.सचिव (ग्रामविकास) घेणार आहेत. त्यातील उकृष्ट प्रकल्पांची निवड करून सदर प्रकल्प राज्यस्तरावर लागू केले जाऊ शकतात.

यासाठी आपल्या अधिनस्त कार्यालयांमध्ये राबविल्या गेलेल्या सर्व ई-गव्हर्नन्स विषयक प्रकल्पांची माहिती दि. २० ऑक्टोबर,२०१६ पर्यंत शासनास सादर करावी, ही विनंती.

आपली विश्वासु,

(सरोज देशपांडे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन